मौजे कुंभारी, तालुका दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूर येथील विडी कामगारांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांनी धारण केलेल्या क्षेत्रास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ११७ (६) मधील तरतुदींनुसार अकृषिक आकारणीतून सूट देणे आणि थकीत अकृषिक कराची रक्कम माफ करण्याबाबत......

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एनएपी-२०१८/प्र.क्र.२०८/ज-१अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

दिनांक :- १६ सप्टेंबर,२०१९.

<u>संदर्भ :</u> १) विभागीय आयुक्त,पुणे यांचे पत्र क्र. मह/२/वतन/कावि/१८/२०१८. दि.२४/०१/२०१८

२) जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे पत्र क्र. २०१८/मशा/कार्या-३/न.भू.-२/आरआर/५९२, दि. ०७/०५/२०१८

३) जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे पत्र क्र. २०१९/मशा/कार्या-३/न.भू.-२/प्र.क्र./आरआर/९९८, दि. ०७/०९/२०१९

४) शासन अधिसूचना क्र.एनएपी-२०१८/प्र.क्र.२०८/ज-१अ, दि.१३/०९/२०१९

<u>प्रस्तावना</u>

मौजे कुंभारी, तालुका दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूर येथे (१) कॉ. गोदूताई परूळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, (२) माँ साहेब विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, (३) स्वामी समर्थ विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, या तीन संस्थांनी धारण केलेले क्षेत्र १५,६०,३४५ चौ.मी. एवढे असुन, त्या क्षेत्रास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ११७ (६) मधील तरतुदींनुसार अकृषिक आकारणीतून सूट देण्याबाबत, तसेच या संस्थांकडे आजमितीपर्यंत थकीत असलेली अकृषिक कराची रक्कम माफ करण्यासंदर्भात शासनास मागणी करण्यात आली होती. त्यासंदर्भातील प्रस्तावास राज्य मंत्रीमंडळाच्या दि. ०९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या बैठकीत पुढीलप्रमाणे मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे:-

"(१) मौजे कुंभारी तालुका, दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर येथील कॉ.गोदूताई परुळेकर, महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, माँ साहेब विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था व स्वामी समर्थ विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था या तीन्ही संस्था ज्या नागरीतर क्षेत्रात तसेच गावठाणाच्या क्षेत्राच्या बाहेरील जमिनीवर स्थित आहेत, अशा शेतजमिनी निवासी इमारतीच्या

प्रयोजनासाठी म्हणून अकृषिक वापरात परिवर्तन करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ च्या कलम ११७(६) मधील तरतुदींनुसार प्राप्त अधिकारात सदर तिन्ही सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या ताब्यातील मौजे कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर येथील क्षेत्र १५६०३४५ चौ.मी. हे शासन राजपत्रात अधिसूचित करून, त्यास अकृषिक आकारणीतून सूट देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

(२) उक्त नमूद प्रयोजनार्थ कलम ११७(६) खाली प्रसिध्द करावयाच्या अधिसूचनेचा मसूदा विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने अंतिम करून शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यास मान्यता दिली.

(३) तसेच, उक्त नमूद तिन्ही संस्थांकडील आजमितीपर्यत असलेली अकृषिक कराची थकबाकी आणि त्यावरील दंड माफ करण्यास मान्यता दिली."

त्यानुषंगाने, मौजे कुंभारी तालुका, दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर येथे (१) कॉ. गोदूताई परूळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, (२) माँ साहेब विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, (३) स्वामी समर्थ विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, या तीन संस्थांनी धारण केलेल्या १५,६०,३४५ चौ.मी. क्षेत्रास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ११७ (६) मधील तरतुदींनुसार अकृषिक आकारणीतून सूट देण्यासंदर्भात संदर्भाधीन अधिसूचना दि.१३ /०९/२०१९ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, वरील निर्णयाच्या अनुषंगाने उक्त नमूद तिन्ही संस्थांनी धारण केलेल्या १५६०३४५ चौ.मी. क्षेत्रास आजमितीपर्यत असलेली अकृषिक कराची थकबाकी आणि त्यावरील दंड माफ करण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मौजे कुंभारी तालुका, दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर येथे (१) कॉ. गोदूताई परूळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, (२) माँ साहेब विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, (३) स्वामी समर्थ विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, या तीन संस्थांनी धारण केलेल्या १५,६०,३४५ चौ.मी. क्षेत्रावरील आजमितीपर्यंतची अकृषिक कराची थकबाकी आणि त्यावरील दंड या शासन निर्णयाव्दारे माफ करण्यात येत आहे.

०२. सदर शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

०३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१६६/२०१९/व्यय-९, दि.२२.०४.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१६२००२०४०९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=eb458b05e05ee27f435bd399537405d44e1c88021cf038b060ac10b9d8fb8787, ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2019.09.16 20:13:04 +05'30'

(रमेश चव्हाण)
सह सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
६) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे वि.का.अ./स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
७) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक, विधानभवन, मुंबई.
८) विभागीय आयुक्त, पुणे
९) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) जिल्हाधिकारी, सोलापूर
११) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य,(१) मुंबई.
१२) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य,(२) नागपूर
१३) सह सचिव(ज-१अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२
१५) निवडनस्ती (कार्यासन ज-१अ)

****